# पोलीस आयुक्त,औरंगाबाद शहर, यांचेकार्यालय,

मिलकॉर्नर,डॉ.बाबासाहेबआंबेडकररोड,औरंगाबाद-४३१००१.
दुरध्वनी क्रमांक-०२४०-२३२६५२४,फॅक्सक्र.०२४०-२२४०५९६.
ईमेल:-ps.splbranch.abad@mahapolice.gov.in


गोपनिय जा.क्र.विशा-५/आदेश/औबाद/२०१९- ४८ औरंगाबाद,दिनांक. १९/०३/२०१९

## महाराष्ट्र पोलिस अधिनियम सन १९५१ चे कलम ३३ (एन) अन्वये

**आदेश :-**

ज्या अर्थी मा.भारत निवडणुक आयोग नवी दिल्ली यांनी दि.१०/०३/२०१९ रोजी महाराष्ट्र राज्यातील सर्व ४८ मतदार संघातून लोकसभेचा सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केलेला आहे. तसेच दिनांक.१० मार्च २०१९ ते निवडणुकीची प्रक्रिया पुर्ण होण्याच्या दिनांकापर्यंत भारत निवडणुक आयोगाने संपुर्ण महाराष्ट्राकरिता आदर्श आचारसंहिता लागू केली आहे.

आणि ज्याअर्थी, सदरील निवडणुकीचे प्रचार मोहिमेच्या कालावधीत सर्व राजकीय पक्षांचे प्रतिनिधी तसेच निवडणुक लढविणारे उमेदवार आणि त्यांचे कार्यकर्ते आणि त्यांचे हितचिंतक यांनी वाहनावर ध्वनीक्षेपक बसवुन मोठया आवाजातुन प्रचार केल्यामुळे ध्वनीप्रदुषण होणे, सर्व सामान्य लोकांच्या जीवनातील शांततेस व स्वास्थ्यास बाधा पोहचविणे व उशिरा रात्रीपर्यंत ध्वनीक्षेपण चालू ठेवणे ईत्यादी बाबींवर निबंध घालण्याबाबत माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी **मी, डॉ.दिपाली धाटे-घाडगे,पोलीस उप-आयुक्त,मुख्यालय,औरंगाबाद शहर** महाराष्ट्र पोलिस अधिनियम १९५१ चे कलम ३३ (एन) मधीलप्राप्त अधिकारानुसार निवडणुकीच्या प्रचारासाठी ध्वनीक्षेपकाचा वापरावर खालीलप्रमाणे निर्बंध घालीत आहे.

०१) ध्वनीक्षेपकाचा वापर संबंधित पोलीस अधिकारी यांचे परवानगी शिवाय करता येणार नाही.

०२) सकाळी ०६:०० वाजण्यापुर्वी अणि रात्री १०:०० वाजेनंतर कोणत्याही फिरत्या वाहनावर व कोणत्याही क्षेत्रात ध्वनीक्षेपाचा वापर करता येणार नाही.

०३) सर्व राजकीय पक्ष आणि निवडणूक लढविणारे उमेदवार आणि इतर व्यक्ती इत्यादी यांनी निश्चित केलेल्या ठिकाणी (Fixed Point) ध्वनीक्षेपकाचा वापर करावा व तत्ससंबंधी अशा ध्वनीक्षेपकाचे वापरासंबंधीत घेतलेल्या परवानगीची माहिती जिल्हादंडाधिकारी, तथा निवडणुक निर्णय अधिकारी व संबंधित यंत्रणेस कळविणे बंधनकाराक राहील. हे आदेश दिनांक. २० मार्च २०१९ पासुन ते आचारसंहितेची मुदत संपेपर्यंत अंमलात राहतील.

सर्व पो.स्टे. प्रभारी अधिकारी, सर्व सहाय्यक पोलीस आयुक्त, सर्व पोलीस उप आयुक्त यांना सुचित करण्यात येते की, सदरचा प्रतिबंधक आदेश सर्व संबंधितांना वैयक्तिक रित्या बजावणे शक्य नसल्याने व त्यांना अवगत करणे आवश्यक असल्याने आपण सदर प्रतिबंधात्मक आदेशास प्रसिध्दी माध्यमे, सर्व पोलीस ठाणे, पोलीस अधिकारी कार्यालय, छावणी मंडळ, महानगर पालिका, मध्यवर्ती बसस्थानक, रेल्वेस्टेशन, मुख्य बाजारपेठा, सार्वजनिक वाचनालये इत्यादी महत्वाच्या ठिकाणच्या सुचना फलकावर चिटकावुन प्रसिध्दी द्यावी. त्याचप्रमाणे पोलीस अधिकारी यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम १६३ प्रमाणे कार्यवाही करावी.

सदर आदेश माझ्या सही व शिक्यानिशी आज **दिनांक.** १९/**०३/२०१९** रोजी औरंगाबाद येथे जारी करण्यात आला आहे.

**( डॉ.दिपाली धाटे-घाडगे )**
पोलीस उप-आयुक्त,मुख्यालय,
औरंगाबाद शहर

प्रति :-

१)सर्व पोलीस उप-आयुक्त, औरंगाबाद शहर
२)सर्व सहाय्यक पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर
३)सर्व पो.स्टे./शाखा, प्रभारी अधिकारी, औरंगाबाद शहर

प्रतिलिपी :-

१)विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव.
२)जिल्हाधिकारी, औरंगाबाद.
३)म.न.पा.आयुक्त,औरंगाबाद
४)उपायुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, औरंगाबाद.
५)जिल्हा माहिती अधिकारी, औरंगाबाद.
६)केंद्र संचालक, आकाशवाणी, औरंगाबाद.
७)सोशल मिडीया,गुन्हे शाखा,औरंगाबाद